श्री

सद्गुरु चरणांबुजीं

ही

मनोरंजन शतकमाला

आदरपूर्वक

नारायण भवानराव पावगी

यानें नम्रपणें

समर्पिली असे.

शके १८१९.

प्रस्तावना.

प्रस्तुतच्या श्लोकशतकाच्या निर्मितीचें मूलकारण ह्या वेळेसच आदरपूर्वक वाचकांच्या पुढें ठेविलें तर, मजकडे अप्रासंगिकपणाचा किंवा अतिशयोक्तीचा दोष बिलकुल येणार नाहीं. कारण, ज्या मनोविकाराच्या योगानें या हृत्पटिकेवर संस्कार होऊन चित्तविकास झाला, त्या चित्तविकासाचें फल, मग तें कितीही नीरस, अमधूर, किंवा अरुचिकारक असो, तें पदरीं पडल्यावर, ज्या साधनांनीं वंध्या बीजास अंकूर फुटून, त्याचा लहानसा वृक्षही बनला, व ज्याला फल येण्याचें कधीं स्वप्नीं देखील नव्हतें, त्यास लहानसें फलही बाजलें, त्याबद्दलची थोडीबहुत हकीकत या प्रसंगीं वाचकांस कळली तर, केवळच निरर्थक होणार नाहीं. सबब तद्विषयक क्षमा याचना न करितां, प्रस्तुत विषयाकडे एकदम वळतों.

शके १८०५ सालीं जिल्हा कुलाबा तालुके रोहें, येथें कसबे मजकुरीं मी अव्वल कारकून असतां, सुमारें श्रावण मासांत कित्येक आधिव्या-

धींनीं माझें मन अगदीं उदास होऊन गेल्यामुळें, केवळ सामर्थ्यहीन झालें. कोणत्याही प्रकारचा उत्साह राहिला नाहीं. चित्तवृति फार म्लान होऊन गेली. एकाएकीं सर्वच शून्यवत् भासूं लागलें. कोणत्याही प्रकारें मनोरंजन होईनासें झालें. सर्वच गोष्टींचा कंटाळा वाटूं लागला. आणि मनाचा धीर तर, कांहीं-एक कारण नसतां, अगदींच सुटल्यासारखा होऊन, विचारशक्तीनेंही आपलें पाऊल बरेंच मागें घेतलें; व त्यांचा परिणाम असा झाला कीं, त्यामुळें बिलकुल कांहींच सुचेनासें झालें.

अशा दुःसह अवस्थेंत बरेच दिवस कंठिल्यावर, एके दिवशीं सकाळीं एकाएकीं चित्तास प्रफुल्लता वाटून मनांत असें आलें कीं, याप्रमाणें काळाचे दिवस विनाकारण मानसिक यातनेंत, किंवा शरीर क्लेशांत, व्यर्थ न घालवितां, ते कांहीं तरी सार्थकीं लागले तर बरें. याप्रमाणें ईशकृपेनें मनोवृत्तींत बदल होतांच, परमेश्वरस्तवन, किंवा थोडी बहुत यथाशक्ति देशसेवा करावी, असें वाटूं लागलें. त्यावेळेस आनंदसूर्याचा चांगला उदय झाला असल्यामुळें, ग्लानितमस आपोआपच लयास गेला होता. तेव्हां, आपल्या सारख्या पामराच्या हांतून ईश-स्तुति ती काय होणार, किंवा देशसेवा करण्यांत

आपलें हातवोट तें कसें लागणार, याविषयीं निरुत्साहक, किंवा मनोभंग करणारी कोणतीच कल्पना यत्किंचित्ही मनांत आली नाहीं. सबब त्याच प्रेमोत्साहभरांत कागद, दऊत, व लेखणी, हीं घेऊन कविता, किंवा विशेष उक्त दिसेल तर श्लोक म्हणा, ते (कारण, कवित्वाच्या योग्यतेस ते उतरले असल्याविषयीं मी धृष्टपणानें गर्वोक्ति करण्याचें साहस करीतच नाहीं, सबब वृत्त पंक्ती कां म्हणाना, त्या) यथामती व यथाशक्ती रचण्यास, या सेवकानें प्रारंभ केला. त्या नंतर, जावत्कालपर्यंत चित्तवृत्ति आनंदांत होती, तावत्कालपर्यंत, त्या आल्हाद वायूनें हें कवनतारूं बऱ्याच पल्ल्यावर नेलें. परंतु पुढें, ती आनंदवृत्ति तशीच कायम राहिली नाहीं; त्यामुळें तें गाडें कांहीं दिवस जेथल्या तेथें तसेंच पडून राहिलें. आणि पुनः पुनः असें वाटूं लागलें कीं, आपलें कवन तें काय? त्यांत प्रेमरस तो कोठून येणार? व त्यापासून फायदा तो काय होणार? "दर्यांत खसखस." या कवनाला विचारतो कोण? आपल्यांत म्हण आहेना, " अधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास." अगोदरच या पामराची कवित्वाविषयीं मोठी स्फूर्त्ति, आणि त्यांत पुनः अशा प्रकारची निराशा. मग काय विचारावें? हातीं घेतलेलें

काम तडीस जाण्याला काय उशीर? एकदां नकाराची ठेंच लागली कीं, तेथेंच अडकले राजश्री.

पण नाहीं. निराधाऱ्याचा परमेश्वर आधार. थकलेल्याचें तोच विश्रांतिस्थान. आणि निराश्रिताची त्या ईशालाच लाज!! थोड्याच दिवसांनीं मला पुनः एकवार प्रयत्न करण्याची इच्छा झाली.

"वेडें वांकुडें गाईन। परि तुझा म्हणवीन ॥"

हा तुकोबारायाचा प्रेमळ अभंग मनांत येऊन, त्या सरसें एकदम धैर्य आणि आवसान आलें, व त्याच्या पुष्टीकरणार्थ,

> प्रारभ्यते न खलुविघ्नभयेननीचैः
> प्रारभ्य विघ्न निहता विरमंतिमध्याः।
> विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
> प्रारभ्यनोत्तमजनाहि परित्यजन्ति ॥

ही कवीची अप्रतीम उक्ति आठवली. मग काय विचारावें, दुधांत साखर पडल्यासारखें झालें; आणि आपण हातीं धरलेलें काम अर्धवट टांकणें चांगलें नाहीं, असें मनाला वाटूं लागलें. व येनकेन प्रकारेण तें पुरें करण्याविषयीं उत्कंठा झाली. तसेंच, त्या वेळीं उत्साहशक्तीनें मन अगदीं परिप्लुत झाल्यामुळें, मनानें मनाचीच अशी समजूत केली कीं, आपण कांहीं कवि नाहीं; किंवा कवित्वाची आपणास

आढ्यताही नाहीं. मग अमक्याच गौरवाचें आपलें कवन (अथवा श्लोक) उतरलेच पाहिजेत, असा अभिमान आपल्यास कां असावा? यदृच्छया या पामराच्या हातून जें कांहीं यथामति घडेल, तीच देशसेवेंत भर समजावी. आतां, अशा प्रकारची देशभाषेंत भर पडली नाहीं तर, काय चंद्राला खळें पडणार? किंवा भाषेला काय उणीव येणार? अथवा देशाचें तें कोणतें नुकसान होणार? याविषयींही त्या वेळेस मनानें उलट खाल्ली. पण, इतकें भीरुत्व बाळगिलें, किंवा असें औदासिन्य दाखविलें, तर या पेक्षांही जास्त परिश्रमाचें व जोखमीचें काम शिरावर घेण्यास, किंवा कांहीं विशेष लोकोपयोगीं कृत्य करण्याच्या कामीं, कायावाचामनेंकरून झटून पडण्यास, कधींच धीर होणार नाहीं, व विश्वासही येणार नाहीं. सबब असा निरुत्साह व भित्रेपणा धरण्याचें कारण नाहीं. याप्रमाणें, पोक्त विचारानें मनाची त्रिवार समजूत करून, चित्ताचें समाधान केलें. आणि ईश स्मरण करून पुनश्च आरंभिलेल्या कार्यास प्रारंभ केला, व तें यथावकाशेंकरून त्याच्याच कृपेनें शेंवटास गेलें.

खरोखर, ईश चमत्कृति व महिमा अगाध आहे. " अपकाराद्धुपकारः " ह्मणून जी आपल्यांत ह्मण

आहे ती खचित् खोटी नाहीं. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें प्रथमतः जी माझ्या मनाची अवस्था झाली होती, त्यामुळें, त्या वेळीं, मजवर अति संकट ओढवल्यासारखें मजला भासलें. आणि त्यांतून आतां कसा तरणोपाय होणार, अशी मजला अतीव चिंता उत्पन्न झाली. परंतु, ती सर्व **परमेश्वरानें** निवारण करून, दर्यागर्क झालेलें तारूं **त्यानें**च पुनः बंदरास लाविलें; आणिउद्विग्न झालेल्या चित्तास प्रेम, आल्हाद, समाधान, व तात्कालिक सुखही दिलें.

ही **श्लोकशतकमाला** केवळ मनोरञ्जनासाठींच रचलेली असल्यामुळें, मनाच्या वृत्तीनें ज्या विषयाकडे धांव घेतली, त्या संबंधींच त्यांत विवेचन केलेलें आहे. नियमित, किंवा एकच विषय यांत प्रतिपादन केलेला नाहीं. **परमेशसेवा**, संसारमिथ्यत्व, कुलीन भार्या, तज्जन्य सुख, दुष्ट स्त्री, तज्जन्य दुःख, षड्रिपूंचें सामर्थ्य, सुखाचें खरें साधन, वैराग्य, तज्जन्य आनंद, मानसिक उन्नति, सद्गुरुप्रसाद, संकटसमयीं रक्षण, प्रतिकूल काल, काल महिमा, आणि मनास उपदेश, यावरच चार ओळी या सेवकानें यथामति लिहल्या आहेत.

ही **श्लोकशतकमाला** पुरी होऊन बरेच दिवस झाले. परंतु कार्य बाहुल्यामुळें, व चित्ताच्या अस्व-

स्थैतेच्या कारणानें, तिचें मुद्रणयंत्रद्वारा प्रकाशन होण्यास फारच अवधी लागला, त्याबद्दल मी वाचकांची क्षमा मागतों.

मुक्काम पुणें, मंगलवार
मार्गशीर्ष शुद्ध ११
शके १८१९.
विजयनाम संवत्सरे.

नारायण भवानराव
पावगी.

मनोरंजन शतक.

जो घेई हस्तिचर्म त्रिभुवनपति हा,
वासुकीच्याच माला,
ज्याणें केला स्विकार स्वशिरिं, बत !
जगन्मातृकेचा सुखाला, ।
तो पावो विश्वमूर्ती सकल हरूनिया,
दुःख विघ्नादितापा,
देवो आनंद पूर्ण प्रभु सकलगुणा गार,
जाळूनि पापा ॥ १ ॥

उत्पत्ति, स्थिति, तूं करूनि, सदया, तें तूच नेसी लया
ऐशा या क्षणभंगुर त्रिभुवनीं, गेलीच आशा लया ।
नाहीं सार्थक जाहलें ह्मणुनि मी, आक्रोश हा बा करी
केली नाहिं तुझी कदां घडिभरीं मीं मानसें चाकरी॥२॥

कराहि सेवा परमेश्वराची
नका करूं व्यर्थचि या नराची ।
अमूल्य ठेवा बहु तोचि जाणा
दुजा नसे त्यासम, थोर राणा॥ ३ ॥

प्रयत्न करितां कसें, भवजलीं बहू गुंतलों
न सार मिळतां कसें, क्षणिक त्या सुखीं मोहलों ।
कसें कळत हें नसें चहूंकडे महा अग्निहा,
असें असुनि टाकिती पद तयावरी तें पहा ॥ ४ ॥
शलभ झटुनी घाली घाला न जाणुनि दीपका,
भुलुनि लटक्या त्या तेजासी, परंतु तुह्मी नका ।
कळत असतां टाकूं डोहीं बळेंच उडी, पहा,
भजनचि करा त्या ईशाचें, किं जाळिल पापहा ॥५॥

नको दुःख देवा ! नको त्रास सारा
जिणें हें नकोरे, नको हा पसारा ।
जिणें व्यर्थ गेलें, न झाली हि सेवा,
ह्मणूनीच वाटे बहू दुःख जीवा ॥ ६ ॥
मी त्रासलों ह्याच जगासि फार
या माजि कांहीं न दिसेंचि सार ।
दुःखांत मीं या बहु पीडलोंरे,
संसार मोहीं खेळु गुंतलोंरे ॥ ७ ॥
किती दुःख मोठें, किती सौख्य थोडें,
सुखां इच्छितां तें बहू दुःख जोडें ।
ह्मणूनी तुह्मी तें नका चाखुं सौख्य,
जरी सौख्य चाखाल होईल दुःख ॥ ८ ॥
सुखामाजि गोडी बहू थोडी जाणा
म्हणूनी तुह्मी तो, भजा देवराणा ।

जरी ठेविशीं तूं पदीं सर्वभाव
भवाब्धी तराया तुला तोचि नाव ॥ ९ ॥
चिंते पासुनि मुक्त होउनि कदां अर्पीन देहास मी
त्वत्सेवेसि सदैव, हें कथमला राया, प्रभो, मीं, नमीं।
वारंवार मनास तापवुनि, ती, नेते अह्मां वांकुडे
चिंता ही करुनी शरीरचि चिता नेते कि अग्नीकडे १०
प्रत्येक क्षाणिं गांजिताति षडरी, त्यानें बहू त्रासलों,
लोभानें बहु याच ताप दिधला, त्यानें बहू कष्टलों ।
कामाग्नींत बुडूनि कष्ट बहु हे दुःसह्य होती खरे,
हानी झालि म्हणूनि तूंचि मजला आतां प्रभो ताररे ११
ऐसें हें कधि भाग्य येइल मला, जेव्हां दयार्द्रा प्रभो
भासेरे तुजवीण सर्व जग हें निर्माल्य, धिग्धिग्, विभो।
जेव्हां मंगल वाणिनें वदिन कीं, देवा मला ताररे,
नाहीं अन्य असा समर्थ दुसरा, जो उद्धरी दोंकरें १२
नाहीं संशय, देई मुक्ति पतिता एकाग्र चित्तें जरी
ध्याई मानव, मंगला शिवसुता, जो सर्व विघ्नें हरी।
देइ जो धनधान्य बुद्धि अतुला, तारी सदा या जना
तोडोनी भवबंध, पूत करितो दुष्ट स्वभावा मना ॥ १३॥
म्हणुनि भजरे विघ्नेशाला, सदा फलदायि हा
त्यज धन अतां मिथ्याबातें, विचार मनीं पहा।
धनचि कुटिला बुद्धी देतें, करी अति पाप तें,
शमदम गुणालाही देतें, अतीव सुतापतें ॥ १४ ॥

आहे जोंवरी अर्थ, रे सुमनुजा, राहे परीवार हा,
जेव्हां होईल नष्ट तो सकल बा, जातील ते स्वागृहा।
जे जे बोलति "**रावसाब**, तुह्मि हो, या ईकडे या बसा"
ते ते जातिल सर्व टांकुनि तुला, बोलोनि "जाज़ा, बसा"
॥ १५ ॥

नको ठेवूं विश्वास अर्थीं कलत्रीं,
नको दंभ दावूं वृथा या चरित्रीं।
बहु दुष्ट कांता, बहु द्रव्य दुष्ट,
असें जाणुनि, त्यांवरी होई रुष्ट ॥ १६ ॥

" कांता नव्हे आपुलि, ती धनाची, "
उक्ती महा ही कविचीच साची।
थोड्याच नारी असती पवित्र
त्यांचेचि गावें यश, वा, चरित्र ॥ १७ ॥

लोकांची स्थिति पाहूनी मजबहु हा खेदरे होतसे
त्यानें विव्हल होउनीच मन हें, उद्गार टाकीतसे।
मिथ्यावाद समस्त वाटत जरी, मातें क्षमाही करा,
ज़ाणोनि मज अज्ञ, मूढ मति हो, सर्वस्वतें लेंकरा ॥१८॥

आज्ञा मोडुनि जातिहो परगृहीं, ऐशा किती त्या स्त्रिया,
वारंवार पतीस गांजुनि, पहा, घेतात इच्छीत त्या।
ना वाटे कधिं लाज त्यांसचि जनीं दुष्कर्म आचारितां,
हे देवा परमेश्वरा सुमतिदे ऐशा स्त्रियां त्वत्सुतां १९

न दुःख वाटे धन कांहिं नाहीं,
न ताप होई मज अन्न नाहीं ।
परंतु जेव्हां श्रवणीं पडेकीं
नारी असे ही व्यभिचारिणी कीं ॥ २० ॥
कांहीं नसे ह्मणुनिना मज दुःख वाटे
जेथें तिथें जगिंच या, अनिवार्य कांटे ।
जेव्हां परंतु अबला कपटे करूनि,
नाथास ती फसविते, अति खेद मानी ॥२१॥
दिली पतीसी बहु गोड भावें
न दुष्ट मार्गास तिणें वरावें ।
परंतु दुर्दैव कधीं न सोडी,
कलंक अग्नींत सदांच ओढी ॥ २२ ॥
उगिच हो!!! अबला " खरि " मानिती
जरि पुसाल, तरी न "इमानि" ती ।
वचन एक निराळिच भावना
फसविते कपटें सरला मना ॥ २३ ॥
अशा थोड्या कांता पतिसि भिउनी फार झटती,
पतीचें प्रेमानें अभिमत कराया ऽनुसरती ।
' प्रिये ऐसें तूंगे, कर, ' ' अधि महाराज करते '
' मनीयेचें सांगा, ह्मणुनि पदरातें पसरितें ' ॥ २४ ॥
' जरी सौख्य आहे **प्रिया** हो तुह्मांसी, '
' तरी सौख्य वाटे बहू मन्मनासी ' ।

' जरी खेद आहे प्रिया त्वन्मनाला '
' तरी देह माझा, प्रिया, शोकशाला ' ॥ २५ ॥

' रे नाथा तुजवीण कोण दुसरा सांभाळ माझा करी '
' तूं त्राता परमेश्वरा समचि तूं माला प्रिया अंतरीं ' ।
' त्वत्पूजा कथिली असे प्रियसख्या आम्हां पुराणांतरीं '
' नाहीं भाव दुजा प्रिया जिवलगा माझ्याच रे अंतरीं '
॥ २६ ॥

' मला नसे रे तुजवीण अन्य '
' तुझ्याच प्रेमें बहु जीव धन्य ' ।
' देवा, करें जोडुनि मागतें कीं '
' ऐसा पती तूं मज दे त्रिलोकीं ' ॥ २७ ॥

' वाटे तुम्हां जें मज तेंचि सांगा '
' संतोष व्हावा, मज हाचि भुंगा ' ।
' मी हात जोडी, पदीं डोइ ठेवी, '
' सांगाल तैसेंहि नमूनि सेवी ' ॥ २८ ॥

' सुखांत दिन ते कसे बहु सुरम्य हो लोटले '
' तुम्हीहि जवळीं असा म्हणूनि दुःख ना वाटलें ' ।
' कधीं कधिं जिवास तो बहुत ताप झाला जरी '
' तरी प्रिय-सखा अती सुवचनेंही तापा हरी ' ॥२९॥

' कदां तव सुरम्य तें वदन पाहिसे जाहलें '
' तुझ्या सुवचनामृतां किति सुखेंच मीं चिंतिलें ' ।

‘ किती त्वरित रे, प्रिया, दिवस गोड ते लोटले ’
‘ असें अठवतां मनीं बहुत दुःख तें दाटलें ’ ॥३०॥
‘ भजन करितां ईशाचें त्या प्रभातहि कंठिते ’
‘ सखिसह तुझ्या वार्तेनें मी दिनार्धहि लोटिते ’।
‘ परि रजनि ही येतां माझे अहा ! असु कांपती ’
‘ शतदिनसमा कंठू कैसी, अरे प्रिय रात्र ती ॥३१॥

‘ किंवा कांहिं तरी सुकाज करितां
मध्यान्ह ती कंठिते ’
‘ प्रातःकाळ तसाच धीर करुनी,
देवार्चनीं लोटिते ’।
‘ जेव्हां दृष्टि पडेहि पश्चिम दिशीं
हा दीप्तिमान् भास्कर ’
‘ धास्ती पोटिं बसे, न कांहिंच सुचे,
देवासि जोडी कर ’॥ ३२ ॥

‘ रात्रीं ह्या मजला सख्या, प्रियतमा
वर्षाप्रमाणें खऱ्या ’
‘ वारंवार मनींच येति सगळ्या
वाईट गोष्टी बऱ्या ’।
‘ केव्हां होइल भेट रे, जिवलगा,
केव्हांच संभाषण ’
‘ ऐसें वाटुनि आश्रुबिन्दु नयनीं
येतात ते तत्क्षण ’॥ ३३ ॥

अशाच विरला जगीं, सुमनसा, सुशीला स्त्रिया
पतीसि बहु तोष देति अति आदरें त्या प्रिया ।
जरी मिळति ऐशिया, तरि जगांत सारें सुख
अशा न मिळती जरी, मग जगीं कशाचें सुख ? ॥३४॥
सुशीला कान्ताही जवळि असतां दुःखचि नसें
त्रितापातें जाळी, शमवि निजनाथा, सुमनसें ।
ह्मणे जी नाथासी 'मनसिं तुह्मि चिंता धरूं नका'
'नमूं शांता, कारा धरुनि त्हृदयीं दुःख हरका'॥३५॥

भार्या हीच मनोरमा बहु गुणीं,
बाला सुशीलान्विता,
भर्तृ प्राणसखी, सदैव पतिच्या
सेवेंत भारी रता ।
ज्याचें पुण्य महत्तया मिळतसे
ऐशीच पुण्यासती
प्राणी धन्य, जगत्तलीं न हि दुजा,
ज्याच्या न भाग्या मिती ॥ ३६ ॥

असें भाग्य थोडें जगीं दुःख भारी
निराशाच्रही सर्व सौख्यासि हारी ।
'उद्यां आजि होईल हा लाभ आह्मां'
असें मानितां दूर तो टाकि तुह्मां ॥ ३७ ॥
बहू धान्य संपत्ति कामा नये रे,
न माता, पिता, बंधु, कांता, न सारे, ।

प्रतीकूळ होईल हा काळ जेव्हां
न कांहींच कामा नये, बाचि तेव्हां ॥ ३८ ॥
असे गर्व, ताठा, अती दुःख खाणी,
न सौख्यासि देतां बहू खेद आणी ।
ह्मणूनी सदा नम्र वाचें वदावें,
जनीं सर्व लोकांसही तोषवावें ॥ ३९ ॥
दयालु **परमेश्वरांघ्रि** कमलीं सदा तत्पर
असा, सकल लोक हो, शरण त्यासि जा, सत्वर
कराल जरि आळस त्वरित काळ हा नेईल,
तुह्मांवरि कृपा न तो करुनि, रुष्ट बा होइल ॥ ४० ॥
कसें मुळिंच ना कळे अजुनि, याहि मूढा जना
कशी, भवनदीं बुडे तरि, न लाज वाटे मना ।
जरी बुडति लोक, हा तरिहि होईना सावध,
स्वकीय हित नेणुनी करिच आपुला तो वध ॥ ४१ ॥
हे साहि शत्रु करिती बहु यातना त्या
ज्या घोर फार, अति दुःसह मानवा त्या ।
त्यांसीच सोडी बहु निग्रह तूं करूनी
धीरासि, शांतिसि अपूर्व फला, धरूनी ॥ ४२ ॥
कामारी, अतिदुष्ट, दुःख सदना
नेऊनि तो दावखवी
तेजासी, स्वपराक्रमासि, मनुजा,
गांजूनि तो लाजवी ।

ज्या योगें अति घोर कर्म करुनी
दोषार्ह होती जन,
त्या कामासि सदा त्यजूनि, नर हो,
बांधूनि टाका मन ॥ ४३ ॥
ज्यानें आणियलें पराक्रम बलें
खाड्यांत मोठे ऋषी
ज्यानें उग्र तपांत भंग करुनी,
केली दशा ती कशी ।
विश्वामित्र महत्तपो-निधिऋषी,
यांसी अनंगे अहा,
तीव्राघात करूनि जर्जर कसें,
केलें तुह्मी तें पहा ॥ ४४ ॥
ह्मणुनि बरवें, सोडी वारे, अनंगचि दुष्ट हा
दमन करूनि मारा त्यासी, अहो विषसर्प हा ।
कठिण दमना चित्तीं वाटे, तरीच बळे करा
सुखद शमना, पश्चात् ध्यात्या शिवा सुमनोहरा॥४५॥
बहु विघ्नहि क्रोध करीतसे
सुख, शांति, हि तोचि हरीतसे ।
अरिहा मनसीं जरि राहिल
अति कष्टि शरीराचि होईल ॥ ४६ ॥

पापाचें मूल लोभ प्रबुध वदति, हें
जाणुनी तोचि सोडा
सर्वा पुण्यासि लावी क्षय, म्हणुनिया
सत्व तो गूण जोडा ।
ज्याच्या योगें बुडालें सकल जग असें
तोचि हा पापमूर्ती
त्या लोभासी तुम्ही हो, समुळ खणुनियां
शुद्ध जोडा सुकीर्ती ॥ ४७ ॥

अंधकार पसरूनि मोह हा
आंधळें करि जनासि दुष्ट हा ।
ज्ञान बुद्धि हरुनीच नेइ तो
वांकुडें, करि मनासि खेदतो ॥ ४८ ॥
मोह जाल पसरूनि शत्रु हा
बांधितो सकल लोक त्यांत हा ।
चापलेंच करि हा रिपूवर
मत्स्यरूपि जन, गट्ट धीवर ॥ ४९ ॥

मदरिपु महान् वेडें सर्वा जनासि अतीवतो
करुनि, मग तो आह्मां मूढा कलंकचि लावितो ।
शिरुनि हृदयीं तो देहाचें विटंबन तें करी,
पिळुनि सकला देहासी हा स्वसत्वाचि कीं हरी ॥५०॥

शत्रू मत्सर हा नको मनासि, गा !
जो पाहुं इच्छी उणें
लोकांचें बरवें कधीं न बघवें,
जो हें करी धिक् जिणें ।
आल्हादासि, सुखासि, हा हरुनियां
चिद्दीप जो मालवी,
त्या चांडाल अरीसि घालवुनि बा
देवांस तूं आळवी ॥ ९१ ॥
आळवील जरि, मीळवील तो
सद्‌गुरूपद सुरम्य, धीर तो ।
प्रेमयुक्त भजनींच राहुनी
तोष पावत असेच या जनीं ॥ ९२ ॥
काय सौख्य!! नच वर्णवें तया
डुल्लतें मनहि पाहुनी जया ।
थोर थोरचि निमग्न जाहले
देहभान विसरोनि राहिले ॥ ९३ ॥
प्रेम निर्झर नदींत पोहती
ब्रह्मधाम कमलींच राहती ।
ध्यान लावुनि सदा निराकृतीं
पूजिती निशिदिनींहि सत्कृती ॥ ९४ ॥
नारदेंच उपदेशिला अधीं
वालि कोळि जन जीव जो वधीं ।

ठेवुनी गुरुपदीं अलौकिक
चित्त कीर्ति मिळवी अलौकिक ॥ ९५ ॥
जीव ते किति असंख्य मारिले
पाप कुंभही भरूनि ठेविले ।
वक्र दृष्टि खल काळ जोंवरी
पापसंचय उणा न तों वरी ॥ ९६ ।
काळ हाचि अनकूळ जाहला
वालि तुष्ट हि सदैव राहिला ।
चित सद्गुरुपदीं महार्षि जो
लावि, जाळि अघ, पाश तोडि, जो ॥ ९७ ॥
निष्ठा पाहुनि सत्य, ईश्वर अतिप्रेमें त्वरें धांवला
साक्षात्कार जयासि होउनि सदा जो मुक्तितें पावला ।
ज्याचें होउनि पापनष्ट अतिते, तेजस्वि जो जाहला,
आत्माराम पदीं निरंतर असा निर्दोष तो राहिला. ९८॥
पाहिजे जरि तुला महेश हा
दंभ टाकुनि हि अंतरीं पहा ।
नाही लांब, अति दूर, तो प्रभू
पाहिजे न फिरणेंहि सर्वभू ॥ ९९ ॥
देहांत देव असतां फिरणें कशाला
पूजावया दगडते, मनुजा सुशीला ? ।
गाठींच धान्य असतां बरवीन भिक्षा
रामासि आळवुनि घे भजनीं सुदीक्षा ॥६०

विश्वास ठेविसि जरी तरी पाविजे तो
आनंदमूर्ति सहजीं, करुनि कृपा तो ।
ज्याचें दयार्द्र त्हदयीं करुणा अपार
दासासि इच्छित फलामृत देइ सार ॥ ६१ ॥
प्ऱ्हाद हाक, करुणा वचनेंच मारी
"नारायणा, शिव, हरे, चल, धांव, तारी"।
फोडोनि खांब अति सत्वर तोचि धांवे,
साहाय्य त्या करुनिया किति शिघ्रपावे? ॥ ६२
तैलांत तप्त जरी लोटुनि दीधलें त्या
होऊनि थंड अतितें, नचदुःख दे त्या ।
ऐसा कृपालु परमेश्वर शिघ्र ठाईं
चोहोंकडे वळुनियां निज पोटिं घेई ॥ ६३ ॥
मायाळु तो बहु असे तुह्मि सत्य जाणा
दासांवरी करि अतीशय कींव राणा ।
कांहीं उणें पडुनि देत नसे कधीं जो
त्यासी भजेल जरी मानव, धीर त्या जो ॥ ६४
संसारचक्र अतिघोर ह्मणुनिया, ते
साधू महान् प्रबळ, सोडुनिया जनातें ।
गेले पळून भयभीत असे, वनातें
एकांत तत्र हरिलाच भजावया, ते ॥ ६५
नामा, तुका, विठु महार, कबीर, नाथ,
सोडूनियां जग, तसेंच अनेक पंथ, ।

मार्गींच सूक्त वळले, हरिसी भजाया
एकाग्रचित्त करुनी शुभगीत गाया ॥ ६६
एकांत वास रमणीय ह्मणूनी तत्र
साधू असंख्य वसती त्यजुनि कलत्र ।
आनंद मूर्ति **शिवपुत्र गजाननातें**
अर्पूनि देह, बहु तोषविती मनातें ॥ ६७ ॥
आनंद पूरित, अतीव सुरम्यरूप
जैसे प्रकाशित दिसे, तरुणेंदु रूप ।
तें **ब्रह्मधाम** स्मरुनी बहु तोष होई.
चिंता दुरी दुरिच सर्व पळूनि जाई ॥ ६८ ॥
रात्रंदिनीं सतत चिंतन तें करावें
प्रेमें, **पुराणपुरुषांघ्रि** निमग्न व्हावें ।
साफल्य होइल जगांत पुरें वपूचें
तोडील गर्दन जरी नर षड्रिपूचें ॥ ६९ ॥
प्राण्या हा काळ गेला, कधिं न परतला
सावध त्वां असावें.
गेला गेला म्हणूनी, **भवभयहरणा,**
दूरदृष्टया पहावें ।
बाल्यावस्थेमधें तें स्मरणहि **हरिचें**
जाहलें नाहिं नाहीं,
तैसें तारुण्य गेलें, रति सुख लुटलें,
हे **प्रभो** ! ! ! पाहि, पाही. ॥ ७० ॥

ज्याचें सौन्दर्य लीला, बघुनि पळति त्या
विघ्न दुःखादिराशी,
ज्याची शुंडा निवारी सकलमदमला,
हारि जो दैन्य राशी ।
तो देवो प्रेम बुद्धी, शुचि, विमल, सदा
गीत गाया तयाचें
देवो तैशीच शक्ती, प्रभु, अमित मला,
ध्यावया रूप त्याचें ॥ ७१ ॥

पळेना, वळेना, चळेना, गळेना,
नतें हि बुडेना, चिरेना, जळेना ।
असें ब्रह्म तें पूर्ण अक्षय्य राही.
जगीं कोंदलें सर्व वस्तूंत पाही ॥ ७२ ॥

रितें ज्याविणें स्थान कोठें मिळेना
तरी तें प्रयासाविणें सांपडेना ।
असें ब्रह्म तें मेळवी, मोह सोडी,
नको नश्वरीं ठेऊं, बा, तूंचि गोडी ॥ ७३ ॥

असोनि न कधीं दिसे सकळ व्यापि गा ब्रह्मतें,
पडेल पदरीं कसें, ह्मणुनि चित्त नाशांत तें ।
समर्थ नहि वेदवाणि, ऋषि, ज्यासि वर्णावया
असें अतुल सौख्य तें, कधिं मिळेल भोगावया ॥७४॥

ऐसें जरी वर्णियलें जयासी
तें प्राप्त होतें विमला जनासी ।

भक्ती जयाच्या त्हदिं पूर्ण आहे
दुष्प्राप्यतें त्यासि कदापि नोहे ॥७५॥
कारे मूढ जनासि भक्ति रुचिरा, लाऊनि ती सौख्यदा,
मातें घालविसी स्वपादकमलापासूनि दूरीं सदां ।
ऐसें म्या अतिघोर पाप जागिं बा, केलें कधीं तें असे,
नाहीं रे स्मरणीं मुळीं प्रभू खरें, तारी मला तूं कसें॥७६

दर्शनेंच अघ दग्ध होउनी
निर्मलत्व अतिदाटलें मनीं ।
प्रेमपूत मन हें सुखावलें
मोह, दैन्य, अति दुःख हर्पलें ॥७७॥

अति शुद्ध असे मनि भाव जरी
प्रभू तो कृपया न उणेंच करी ।
उडि घालुनि काज करी, नसरे,
न असा दुसरा जागिं हेंचि खरें ॥ ७८ ॥

अठ्ठाशें नवशाक अब्दि रुचिर प्रातः प्रभूचें अहा
प्रेमाल्हाद पवित्र दर्शनें[1] असें झालें मला तें पहा।
होता मंगल तो सुरम्यदिन कीं गंभीर तेजार्पित
उत्साहीं **विजया पवित्र दशमी,** त्याही दिनीं शोभत
॥ ७९ ॥

प्रभू असोनि जगीं स्थिति जो करी
नसुनि कारण, कर्मचि आचरी ।

---

१ आपा महाराजांचें दर्शन.

जणु जगासिच सोइस लावण्या
करि सुकर्म तदुन्नति पाहण्या ॥ ८० ॥
प्रभूसद्गुरु शांत, दांत, प्रतापी,
कृपाळु महान् थोर तैसा तपस्वी ।
बहू प्रेमभावें दयाशान्ति ठेवी
मनाला अतीआदरें बोध लावी ॥ ८१ ॥
प्रसाद तुह्मि जी करा, मजवरीं कृपादृष्टी द्या,
सकंप विनये नमूनि, पदरीं सदा दास घ्या ।
ह्मणूनि हळू बोलुनी बहुत आदरें ठेविलें
सदांघ्रि कमलीं, सदा ममशिरस्तयीं अर्पिलें ॥८२॥
करद्वया जोडुनि शीर्ष ठेलें
भिकाजि आपा गुरुसीं नमीलें ।
ऐकूनि घेऊनि हि मद्वचासी
प्रसन्न वाचें करि बोध दासीं ॥ ८३ ॥
वर्षाव केला परमामृताचा
जेणेंच झाली सुपवित्र वाचा ।
संताप, दुःखाग्नि, लयासि गेला
आनंद, आल्हाद, मनासि झाला ॥ ८४ ॥
भाण्डार आलें जणु काय हातीं
कीं लाभलें सौख्य, त्रिलोक गाती ।
आनंद ऐसा मजला जहाला
प्रसन्नता, लाभ, अतीव ठेला ॥ ८५ ॥

सुप्रसन्न बहु चित्त जाहलें
काम, मोह, मद, सर्व राहिलें ।
श्रीगुरू सदय जाहल्यावरी
तो मनोरथ सुपूर्ण ही करी ॥ ८६ ॥
विकल्प संकल्प लयासि लावी
शांती सुखा स्पष्ट अतीव दावी ।
अनश्वरा सत्वर तोचि देई
अज्ञान, कामाग्नि, लयासि लावी ॥ ८७ ॥
प्रेमानें नयनिंच अश्रुबिंदु आले
त्यायोगें ममसुख तें प्रफुल्ल झालें ।
सौख्याच्या जणु शिखरींच पोंचलोंसें
वाटे कीं, परमसुखांत देह भासे ॥ ८८ ॥
केला तो मज उपदेश सद्‌गुरूनें
केलें सार्थक तनुचें असेंच ज्याणें ।
प्रेमानें अतिशय कंठ दाटला तो
वाचेनें नच वदवे प्रभावकीं तो ॥ ८९ ॥
सद्‌भावें जरि मृदु चित्तवृत्ति राहे
पावे तो भवभयहारि, बा, खरें हें ।
ज्या काजें शरण तयासि तूंचि जाई
त्या कामीं दवडत तो त्वरेंच येई ॥ ९० ॥
चित्ताची करूनि सदैव शुद्धवृत्ती
ध्याईती अति सुखदा विशुद्ध मूर्ती ।

विघ्नेशा भज, भज, तूं सुधैर्य दावी,
श्रद्धा, शांति, दम, शमासि, पूर्ण भावी ॥९१॥
आज्ञा घेउनिही **प्रभूचरणिं** मी डोई असे ठेविली
आशीर्वाद तसाच मागुनि, सदां काया तयीं अर्पिली।
प्रेमाल्हाद, तशीच शान्ति, गुरुची पाहूनि आनंद हा
झाला, सच्चरणारविंदि नमुनी, यत्नें निघालों पहा।९२।
किती सांगू प्रेमा, मजवरि असे जें **प्रभूजिचें**
किती वाणू मी त्या सदय त्हदयातें गुरुजिचें ।
मृदू ऐसी वस्तु खचित न मिळे ह्या त्रिभुवनीं
सतांच्या भाग्यासी कधिन तुलना ह्या त्रिभुवनीं ॥९३॥
अनेक विघ्नेंहि अनेक काळीं
आलीं, तरी त्या **प्रभूनें** सुवेळीं ।
वारूनि दासासि विमुक्त केलें
दुःखांतुनी, सौख्य मनासि घालें ॥ ९४ ॥
काळाची प्रतिकुलता असे जरी ही।
नाहीं तों वरी अनुकूलता कधींही
कीं वाटे सरल पथेंच चालतांही
दुःखानें विकलचि जीव होतसेही ॥ ९५ ॥
न्यायानें जरि वर्तलों, असे सदाही
भीतीनें, जरि चालतों, पदोंपदीं ही ।
सन्मार्गें, जरि टाकलों, परिश्रमेंही,
काळानें नच सोडिलें असें कदाही ॥ ९६ ॥

ऐसा दुर्धर कलि पाठिं लागला तो
खोवोनी सुख, मज शांति तो न देतो ।
सर्वांशीं खटपट व्यर्थ सर्व जाई
कालेशा, तवमहिमा अगाध, पाहि ॥ ९७ ॥
आम्हांवरी तूं जरि रुष्ट होसी
तरी असावी सुगतीच कैसी ? ।
ह्मणूनिया त्वच्चरणाप्रती मी
अर्पूनि माथा, तुज वंदितों मी ॥ ९८ ॥
ज्याचेंच साम्राज्य अनंत काळीं
कालेश ऐसा नमितों कपाळीं ।
ज्याच्या कृपें सर्व जगासि रक्षा
कृपा न होई तरी सर्व रक्षा ॥ ९९ ॥
दयार्द्र दृष्टी म्हणूनीच व्हावें
करी कृपा, रुष्ट कदांन व्हावें ।
करद्वयां जोडुनिया प्रभोरे
अर्पीतसे देह, दयानिधे, रे. ॥ १०० ॥
चपल मनसा, राहीं, आतां, हरीपदपंकजीं
जपतप करी निष्ठेनें बा, नुरे तव काळजी ।
विमलमन तें होई जेव्हां, तुला सुख होइल
मदरिपु महान् जाता, सारा विकल्पचि राहिल १०१

समाप्त.

शुद्धिपत्रक.

गद्यांतील.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
२	९	त्यांचा.	त्याचा.
३	२२	चिवारावें.	विचारावें.
४	९	आवसान.	अवसान.
,,	१८	. (पूर्णविराम)	; (अर्धविराम)
५	३	यदृच्छचा	यदृच्छया
६	१	खचित्.	खचित.

पद्यांतील.

१	६	हरूनिया.	हरुनिया
,,	१०	नेसी.	नेशी.
,,	११	त्रिभूवनीं	त्रिभुवनीं.
२	३	चहूंकडे.	चहुंकडे.
,,	१०	नकारे.	नकोरे.
३	१७	देइ.	देई.
४	५	ठेवूं.	ठेवुं.
,,	८	जाणुनि.	जाणुनी.
,,	,,	होई.	होइ.
,,	१३	पाहूनी.	पाहुनी.
,,	,,	बहु.	बहू.
,,	१६	जाणोनि.	जाणोनी.

पृष्ठ.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
५	१९	करते.	करिते.
६	१३	पर्दी.	पर्दि.
,,	१५	लोटलें.	लोटले.
६	१९	पाहिसे.	पाहिसें.
,,	२०	मुखेंच.	सुखेंच.
७	६	कैसी.	कैशी.
,,	१५	रांत्रीं.	रात्री.
,,	२१	आश्रुबिंदु.	अश्रुबिंदु.
८	८	शांतां, कारा.	शांताकारा.
,,	९	बहुगुणीं.	बहुगुणी.
९	९	नेईल.	नेइल.
१०	१४	करूनि.	करूनी.
१२	२२	वधीं.	वधी.
१३	२	कीर्तीं	कीर्ती.
,,	४	ही.	हि.
१४	१	तरी.	तरि.
१५	३	म्हणूनी.	ह्मणूनि.
,,	४	त्यजुनि.	त्यजुनी
,,	१२	पुरुषांघ्रि.	पुरुषांघ्रीं.
१७	१२	प्रभू.	प्रभु.
१८	३	सद्गुरु.	सद्गुरू.
२०	१६	तों वरी.	तोंवरि.
२१	१२	तरी.	तरि.
,,	१३	ह्मणूनीच	म्हणुनीच.

D
180